महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील बदल्या/पदस्थापना..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली २०१७/प्र.क्र. २४४/सेवा-२
गो.ते.रुग्णालय इमारत संकुल, १० वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: ०८ मार्च, २०१८

वाचा-१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. बदली-२०१७/प्र.क्र.१२३/सेवा-२, दि. ५.८.२०१७
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. बदली-२०१७/प्र.क्र.२४४/सेवा-२, दि. ११.१०.२०१७

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील डॉ. अंबरिष मोहबे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक (चिकित्सा) स्त्री रुग्णालय गोदिंया यांची शासन आदेश दि. ५.८.२०१७ अन्वये वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, रजेगांव, जि. गोदिंया येथे बदली करण्यात आली होती. त्यामध्ये अंशत: बदल करुन त्यांची शासन आदेश दि. ११.१०.२०१७ अन्वये वैद्यकीय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय देवरी, जि. गोदिंया येथे बदली करण्यात आली. सदर बदली आदेशा विरुध्द डॉ. अंबरिष मोहबे यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर येथे मुळ अर्ज क्र. ८०१/२०१७ दाखल केला असून, मा. न्यायाधिकरणाने दि. १६.१०.२०१७ रोजी अर्जदाराच्या निवेदनावर निर्णय घेण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार डॉ. अबरिष मोहबे यांचे निवेदनावर निर्णय घेण्यात आला असून, त्यांची या आदेशाव्दारे वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय कळमेश्वर, जि. नागपूर या रिक्त पदावर बदली करण्यात येत आहे.

२. सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि कलम ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०८१५४९३६२११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2018.03.08 17:10:50 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
४) उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर

५) जिल्हा शल्य चिकित्सक,स्त्री रुग्णालय, गोदिंया
६) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, गोदिंया
७) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
९) जिल्हा कोषागार अधिकारी, गोदिंया/नागपूर
१०) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय रजेगांव, जि. गोदिंया
११) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, देवरी, जि. गोदिंया
१२) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर, जि. नागपूर
१३) मा. मंत्री (आरोग्य) / मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१४) प्रधान सचिव (आरोग्य व कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक
१५) डॉ. अंबरिष मोहबे, यांना (संचालक,आरोग्य सेवा, मुंबई यांचेमार्फत)
१६) निवडनस्ती (सेवा - २)